# आली नाश्ता सेंटरचे नाव बदलण्याची वेळ

## हॉटेलचालकास ट्रेडमार्क, कॉपीराईटचे उल्लंघन केल्याने बितले

**नाशिक । प्रतिनिधी**

उपहारगृहाच्या नावाचा ट्रेडमार्क नोंदणीकृत असतानाही दुसऱ्या व्यावसायिकाने त्याच नावाची नक्कल करुन व्यवसाय थाटल्याने त्याला कायदेशिर धडा मिळाला आहे. अशोकस्तंभावरील श्री कृष्णा वडापाव या नावाची नक्कल करून व्यवसाय केल्यावर नोटिसा मिळताच या व्यावसायिकाने उपहारगृहाच्या नावात बदल केला आहे.

श्री कृष्णा वडापाव सेंटर अनेक वर्षांपासून व्यवसाय करत आहे. या नावाचा ट्रेडमार्कही नोंदणीकृत आहे. मात्र, अनेकवेळा काही ग्राहकांनी तुमच्या दुसऱ्या शाखेची गुणवत्ता ठीक नसल्याचे कळवत श्रीकृष्णा बोंबटकर यांच्याकडे नाराजी व्यक्त केली होती. मात्र आमची या ठिकाणी शाखाच नसल्याचे बोंबटकरांनी स्पष्ट केले होते. त्यांनी माहिती घेतली असता श्री कृष्णा वडापाव या नावाची नक्कल करत एका व्यक्तिने व्यवसाय थाटल्याचे त्यांच्या लक्षात आले. यानंतर त्यांनी कॉपीराईट व ट्रेडमार्क मार्क ॲक्टद्वारे संशयित व्यावसायिकास कायदेशीर नोटीस पाठवली. नाव कॉपी केले असल्याचे या व्यावसायिकाने कबूल केले. नोटीस आणि कायद्याची गंभीरता लक्षात घेता व कायदेशीर कार्यवाहीचा ससेमिरा टाळण्यासाठी संशयित हॉटेल मालकाने स्वतःच्या हॉटेलचे नांव पूर्णपणे बदलले आहे. याबाबत श्रीकृष्णा बोंबटकर व स्वप्नील बोंबटकर यांनी समाधान व्यक्त केले असून या कायदेशीर लढाईत बौद्धिक संपदा कायदातज्ज्ञ ॲड. कुणाल देवरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

> नाशिक हे प्रगत होत असून, बौद्धिक संपदेची नोंदणी (कॉपीराईट) व जागरुकता बहुतांश व्यावसायिकांत दिसून येते आहे. या कायद्यान्वये नोंदणी असल्यामुळे मूळ मालकास संभाव्य व्यावसायिक फटका टाळता आला. अन्यथा नुकसान झाले असते.
> ■ ॲड. कुणाल देवरे

# जगातील सर्वात लांब पत्राद्वारे गुरुदेवांना साकडे

**नाशिक । प्रतिनिधी**

जगातील सर्वात लांब पत्राद्वारे दिगंबर सप्रंदायातील सर्वात ज्येष्ठ साधू कुंथुसागर गुरुदेव मालसाने गावात णमोकार तीर्थक्षेत्राचा प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास उपस्थित राहणार आहे. गुरुदेवांनी येण्यास सहमती दिल्याने भाविकांत आनंद व्यक्त होत आहे.

या तीर्थावर जगातील सर्वात मोठे समवशरण, सर्वात मोठ्या पंचपरमेष्ठींच्या प्रतिमा, णमोकार म्यझियम, गुरुभवन आदि निर्माण झाले आहे. तीर्थक्षेत्राचा प्राणप्रतिष्ठा सोहळा ६ ते १३ फेब्रुवारी २०२६ मध्ये होणार आहे.

कार्यक्रमास गुरुदेवांची उपस्थिती असावी, अशी सगळ्या विश्वस्त मंडळ वं भक्त परिवारांची इच्छा होती. त्याचाच भाग म्हणून हे जगातील सर्वात मोठे पत्र बनविले आहे. हे पत्र नाशिकमध्ये तयार करण्यात आले होते. याची लांबी १५१ फुट व रुंदी ३ फूट आहे. हे जगातील सर्वात लांब पत्र आहे. यासाठी फ्लेक्सचे मटेरियल वापरण्यात आले आहे. यामध्ये सर्व मॅटर लिहिण्यासाठी दोन दिवासांचा कालावधी लागला. त्यासाठी नाशिक येथील पारस लोहाडे व सहकाऱ्यांनी विशेष परीश्रम घेतले. पत्र काल कुंथुगिरी येथे आचार्य कुंथुसागरजींच्या चरणी अर्पण करण्यात आले. यासाठी निलम अजमेरा, संतोष जैन पेंढारी, महावीर गंगवाल, अनिल जमगे, संतोष काला, बाबुभाई गांधी, ललीत पाटणी, संजय कासलीवाल, विनोद लोहाडे, जितेंद्र शाह, प्रकाश सेठी, मिहीर गांधी, ओम पाटणी, पारस लोहाडे, अजित जैन, भरत ठोळेंसह पदाधिकारी उपस्थित होते.



> गुरुदेवांनी जरुर यावे, यासाठी त्यांना यामध्ये विनंती करण्यात आली आहे. कार्यक्रम खूप मोठा आहे, त्यांच्या येण्याने कार्यक्रमाची शोभा वाढेल. म्हणून आम्ही एवढे मोठे पत्र तयार करण्याचे ठरविले. गुरुदेवांनी सर्व भक्तांचे म्हणणे ऐकून येण्यास सहमती दर्शविली आहे.
> ■ नीलम अजमेरा, अध्यक्ष णमोकार तीर्थ

पान १ वरून ....

## जातनिहाय जनगणना अधिसूचना जारी

ॲप्लिकेशन्समधून ही प्रक्रिया केली जाईल. देशभरातील लोकसंख्येशी संबंधित डेटा जमवण्यासाठी सरकारला १३,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येण्याची अपेक्षा आहे. या मोठ्या मोहिमेचे आयोजन ३४ लाख प्रगणक आणि पर्यवेक्षक आणि डिजिटल उपकरणांनी सज्ज असलेल्या १.३ लाख जनगणना अधिकाऱ्यांकडून केले जाईल.

अधिसूचना जारी होण्याच्या एक दिवस आधी रविवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन, भारताचे रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत जनगणना तयारीचा आढावा घेतला.

## ‘ऑपरेशन लोटस’मुळे नाशकात भूकंप

(उद्धव ठाकरे), काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार) आणि शिवसेना (शिंदे) यांच्यासाठी ही गंभीर चिंतेची बाब आहे. नाशिकचे राजकारण पुढील काही दिवसांत आणखी धगधगत जाण्याची चिन्हे आहेत. आगामी निवडणुकांपूर्वी उलथापालथीचे राजकीय समीकरणे समोर येऊ शकतात. ‘ऑपरेशन लोटस’ची सूत्रे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी सांभाळल्याची खात्रीलायक माहिती आहे. त्यांनी नाशिकच्या स्थानिक राजकारणात वजनदार भूमिका बजावत अनेक बड्या नेत्यांना भाजपत आणण्यात यश मिळवले आहे. विशेष म्हणजे, एका माजी महापौरासह अशोक सातभाई व डझनभर माजी नगरसेवक आणि कार्यकर्तेही भाजपत प्रवेश करणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

### कामगार संघटना भाजप छत्राखाली?

नाशिक मनपातील म्युनिसिपल कामगार संघटना बबनराव घोलप यांच्या पुढाकाराने स्थापन झाली. तिचे नेतृत्व सध्या सुधाकर बडगुजर करतात. आता ही संघटनाही भाजपच्या प्रभावाखाली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनातील आंतरिक समीकरणेदेखील मोठ्या प्रमाणात बदलू शकतात.

### हेमलता पाटील यांचे अर्थपूर्ण मौन

भाजप प्रवेश प्रक्रियेत माजी आमदार हेमलता पाटील यांचेही नाव चर्चेत आहे. त्यांनी अद्याप आपली अधिकृत भूमिका स्पष्ट केलेली नाही. मात्र, भाजपशी त्यांचा संवाद सुरू असल्याचे सूचक वृत्त आहे. त्यांच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बसची दोन दुचाकींना धडक; दोघांचा मृत्यू

परिस्थितीकडे दुर्लक्ष केले. त्यावेळी द्वारका बाजूकडून बिटकोकडे जात असलेल्या दोन दुचाकींना सुझुकी (एमएच १५ सीआर ९४३५) स्प्लेंडर (एमएच १५ ईएन २९६२) जोरदार धडक दिली. त्यामुळे या अपघातात सुझुकी दुचाकीवर असलेल्या रूपाली सचिन काळे (वय ४२, रा. नारायण बापू नगर, जेलरोड) आणि स्प्लेंडर दुचाकीवरील संतोष एकनाथ संसारे (वय ४८, रा. लेखा नगर, सातपूर) हे दोघे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान अपघात झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात दोन्ही बाजूने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या तसेच नागरिकांनी अपघात ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. अपघाताचे वृत्त समजतात उपनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे व त्यांचे सहकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले त्यानंतर नागरिकांच्या मदतीने त्यांनी जखमेना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले

अपघातग्रस्त बस आणि चालक शरद भोई यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, या प्रकरणी पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे

# गोविंदनगर परिसरात पाणीटंचाई गंभीर

## उपाय न झाल्यास आंदोलन



**नवीन नाशिक । प्रतिनिधी**

प्रभाग क्र. २४ मधील गोविंदनगर परिसरात गेल्या दोन ते तीन दिवसांपासून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अत्यंत कमी दाबाने होत असून, काही भागांमध्ये तर पाणी येणेच पूर्णपणे बंद झाले आहे. परिणामी नागरिकांना रोजच्या जगण्यात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून, महिला व वयोवृद्धांना विशेषतः याचा त्रास होत आहे. वारंवार नाशिक महानगरपालिका प्रशासनाकडे तक्रार करूनही कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचा सूर आहे.

या संदर्भात परिसरातील नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते कैलास चुंभळे यांना प्रत्यक्ष भेटून पाण्याच्या संकटाची माहिती दिली. प्रशासनाच्या हलगर्जीपणाबाबत रोष व्यक्त केला. परिसरात नागरिक आणि महिला वर्गामध्ये संतापाचे वातावरण असून, लवकरात लवकर मनपाने ही समस्या सोडवावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

> तांत्रिक अडचणीमुळे दोन दिवस पाण्याच्या टाक्या भरू शकल्या नाही. त्यामुळे सदरहू परिसरात कमी दाबाने पाणीपुरवठा झाला. मात्र आता काही अडचण नसल्याने पाणीपुरवठा सुरळीत होईल.
> ■ हेमंत पठे, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग नवीन नाशिक

चुंभळे यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की,नाशिक महानगरपालिकेने गोविंदनगरसह संपूर्ण प्रभाग क्र. २४ मधील पाणीपुरवठा सुरळीत करावा. अन्यथा नागरिकांसोबत आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल. प्रशासनाने वेळेवर याची दखल घ्यावी अन्यथा गंभीर स्वरूपाचे परिणाम भोगावे लागतील. यावेळी परिसरातील संज्योत कमोद, विनोद शिंदे, पुरुषोत्तम पवार, सतीश पालवे, सिद्धार्थ अहिरे, चंचल सोनवणे, नरेंद्र गांगुर्डे, आर. के. पाटील, शेखर पुंड, शशिकांत महाजन आदींसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## नाशिक बाजारभाव (क्विंटल)

| शेतमाल | किमान भाव | कमाल भाव | सरासरी भाव |
|---|---|---|---|
| टोमॅटो | ३५० | ३२७० | १३५० |
| वांगी | ४०० | ६००० | ५००० |
| फ्लॉवर | ७२० | १६१० | १०७० |
| कोबी | ५८५ | १२५० | ८३० |
| कारले | ३३३५ | ६२५० | ५००० |
| भोपळा | १३३५ | २६७० | २००० |
| दोडका | ५८३५ | ७५०० | ६६७० |
| गिलके | ३३३५ | ५४२० | ४७९० |
| गवार | ४५०० | ६५०० | ५५०० |
| भेंडी | २५०५ | ५००० | ४१७० |
| काकडी | १००० | ३५०० | २७५० |
| लिंब | ३७५० | ५५०० | ४५०० |

# क्रेडाईकडून दरमहा बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी



**नाशिक ।** क्रेडाई नाशिक मेट्रोच्या वतीने सामाजिक बांधिलकी म्हणून दर महिन्याच्या ९ तारखेस, क्रेडाई सभासदांच्या विविध बांधकाम साईटवर बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. विराज इस्टेटच्या गोविंदनगर येथील साईटवर आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचाराने या उपक्रमाची सुरवात झाली.

तसेच उपक्रमांतर्गत बागड प्रॉपर्टीजच्या द रिझर्व्ह या साईटवर बिर्ला हॉस्पिटलतर्फे नेत्र तपासणी शिबिरही आयोजित करण्यात आले होते. क्रेडाई नाशिक मेट्रोचे अध्यक्ष गौरव ठक्कर व बागड डेव्हलपर्सचे दीपक बागड यांनी बांधकाम कामगारांना मार्गदर्शन केले. बांधकाम कामगार कल्याण मंडळातर्फे बांधकाम कामगारांनी मंडळाकडे नोंदणी करावी तसेच, नोंदणी करतांना काही अडचणी असल्यास तर क्रेडाईमध्ये संपर्क साधावा असे आवाहन उपाध्यक्ष अनिल आहेर यांनी केले.

या शिबिरात १०२ बांधकाम कामगारांची नेत्र तपासणी करण्यात आली. डॉ.प्रशांत बिर्ला यांनी पुढील १ महिन्यासाठी साईटवरच्या कामगारांची मोफत नेत्रतपासणी केली जाईल, असे जाहीर केले. बागड प्रॉपर्टीज्चे धनंजय बागड यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सहसचिव नरेंद्र कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. सह समन्वयक सुधीर देवरे यांनी आभार मानले. कार्यक्रमास सचिव तुषार संकलेचा, मॅनेजिंग कमिटी सदस्य सागर शहा, वृषाली हिरे, अजिंक्य बागड उपस्थित होते.

# टाटा एआयजीची नवी पॉलिसी

**नाशिक ।** संरक्षणाची कमतरता ओळखून टाटा एआयजीच्या स्मॉल बिझनेस इन्श्युरन्स सोल्युशन्सने नव्या पॉलिसीची नुकतीच घोषणा केली आहे. आग आणि संबंधित धोके, यंत्रसामग्रीतील बिघाड आणि व्यवसायात व्यत्यय आणणाऱ्या घटना इत्यादींसाठी याद्वारे विमा संरक्षण पुरवले जाणार आहे. इलेक्ट्रिकल शॉर्ट सर्किटमुळे लागलेली आग किंवा मुसळधार पावसामुळे आलेला पूर अशा काळात उत्पादन होऊ न शकल्याने होणारे नुकसान या पॉलिसीमध्ये कव्हर केले जाणार आहे. यामुळे व्यवसाय वेगाने पूर्ववत स्थितीत येण्यात मदत मिळणार असल्याचे ईव्हीपी आणि नॅशनल हेड प्रणय शाह यांनी सांगितले.

# अझीम प्रेमजी फाउंडेशनची ‘हेल्थ इक्विटी फेलोशिप’

**नाशिक ।** अझीम प्रेमजी फाउंडेशनच्या वतीने ‘अझीम प्रेमजी हेल्थ इक्विटी फेलोशिप’ जाहीर करण्यात आली आहे. फेलोशिप १८ महिन्यांची आहे. फेलोशिप अझीम प्रेमजी फाउंडेशन आणि देशभरातील ११ प्रतिष्ठित आरोग्य संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून राबवली जात आहे. या कार्यक्रमाअंतर्गत फेलोशिपधारकांना ग्रामीण भागातील रुग्णांसोबत प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव मिळणार आहे. विविध रुग्ण प्रकारांच्या हाताळणीचा सराव आणि वरिष्ठ डॉक्टरांकडून मार्गदर्शन यामुळे फेलोजना प्रभावी क्लिनिकल कौशल्ये आणि समुदायातील आरोग्यविषयक अनुभव मिळणार आहे.

# ब्रह्मगिरी स्वच्छता अभियान

## एक टन प्लास्टिक कचरा संकलित




**नाशिक ।** स्वच्छ आणि वणवामुक्त सह्याद्रीचा संदेश देण्यासाठी ‘सह्याद्री मित्र संमेलना’निमित्त ब्रह्मगिरी दुर्गावर स्वच्छता अभियान पार पडले. यात सुमारे एक टन प्लास्टिक कचरा संकलित करण्यात आला.डोंगरभटकंती करणाऱ्या राज्यातील गिर्यारोहकांसाठी कॉलेजरोड येथील गुरुदक्षिणा हॉलमध्ये नुकतेच सह्याद्री मित्रसंमेलन आयोजित करण्यात आले होते. गेल्या काही वर्षांत, या गडावर भाविकांची संख्या वाढली आणि त्यांच्यामागे कचराही वाढला. यामुळे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या मोहिमेत नाशिकच्या विविध गिर्यारोहक संस्था, पर्यावरणप्रेमी संघटना व सुमारे १५० हून अधिक स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.‘स्वच्छ गड आपला अभिमान’ या संकल्पनेने प्रेरित होऊन, येत्या काळात इतर गडांवरही अशी स्वच्छता मोहीम राबवण्याचा निर्धार करण्यात आला. उपक्रम यशस्वीतेसाठी संजय अमृतकर, प्रकल्प प्रमुख दिलीप गिते, नियोजन प्रमुख भास्कर मेढे, किरण खैरे, गौरव शिरोडे, रत्नाकर भामरे, संदीप काकड, सागर जोशी, प्रकाश शेळके, विजय हिंगमिरे, ओमप्रकाश रावत, स्मिता गाडेकर, गीता पाटील आदींनी प्रयत्न केले.

# गुन्हेगारीला आळा घाला; मनसेची मागणी

**नाशिक ।** नाशिक शहर व ग्रामीण परिसरात वाढणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्ती, बेकायदेशीर व्यवसाय आणि जनतेच्या सुरक्षिततेविषयी तातडीच्या उपाययोजना करण्याबाबत मनसेच्या वतीने अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांना निवेदन देण्यात आले.

नाशिक शहर व ग्रामीण भागात मागील काही महिन्यांपासून गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. दिवसाढवळ्या खून, दरोडे, चोरी, धमक्या, चैन स्नाचिंग, कोयता तलवारीने हल्ले, दहशत निर्माण करणे, बेकायदा सावकारी, गाड्या जाळणे यांसारख्या बेकायदेशीर व्यवसायांचे जाळे उघडपणे वाढत आहे. याबाबत त्वरीत कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, रतनकुमार इचम, अंकुश पवार, सुदाम कोंबडे, सुजता डेरे, भाऊसाहेब निमसे, खंडेराव मेढे, अमोल जाधव, रामदास खैरनार, आदी उपस्थित होते.

## शब्दकोड :२७९



**आडवे शब्द** : १) शीख धर्माचे संस्थापक. ५) कार्तिकी पौर्णिमेचे एक नाव. ७) पुष्कळ, नाना. ९) कोर्टातील दावा. ११) प्रकाश देणारा किटक. १३) काळ्या रंगाची पूड. १४) गोलाकार. १७) रममाण, निमग्न. १८) चंद्राची कड. १९) प्रवास (हिं.) २०) एक शिकारी पक्षी. २१) मऊ. २३) श्वान. २४) रागाचा उद्रेक. २८) मुलायम कापड. २९) मगज. ३०) न वापरलेली, नवी ??. ३१) कुराणातील वचने. ३३) माफ. ३५) उणीव, न्यूनता. ३८) पादत्राण. ३९) अंतःपूर. ४१) पेशव्यांचे निशाण. ४३) शरीर. ४४) चालू काळ. ४५) हिवाळा. ४६) जमिनीवरील कर. ४८) सारखे प्रमाण. ५१) पुन्हा. ५२) पुष्कळ, खूप. ५३) सवतीबद्दलचा द्वेष. ५६) वाळवी. ५८) मनाने घेतलेली भीती. ६०) पुष्पदल. ६२) मवाळ धोरण. ६४) सापाने टाकलेली त्वचा. ६५) वाळवंट. ६६) घाव. ६७) गंध. ६८) लाकडाची एक उत्कृष्ट जात. ६९) मासे पकडणारा कोळी (सं.) ७०) मज्जाव (हिंदी) ७१) चुणीदार पट्टी. ७२) सगळे.

**उभे शब्द** : १) भागाकाराच्या विरुद्ध. २) नावाडी. ३) अभिनेता. ४) कलावंत. ५) काशी, प्रयाग व गया या तीर्थ क्षेत्राची यात्रा. ६) कमळ. ७) खसखस लावून तळलेला गोड पदार्थ. ८) छोटी घागर. १०) सावली. १२) सांभाळ, रक्षण. १५) श्रीरामाबरोबर वनवासात साथ देणारा रामबंधू. १६) बैलास बांधण्याचा दोर. १८) नाजूक. २२) वाईट लक्षणे असलेला. २३) लक्ष्मीचे एक नाव २४) तफावत. २५) अर्थहीन, काहीबाही. २६) श्रीमंतच्या विरुद्ध. २७) एक पालेभाजी. ३२) छोटासा. ३४) आईची बहीण. ३६) प्रवासातील टप्पा. ३७) चापट, मऊ पदार्थाचा आघात. ३७ अ) थाळी. ३९) एक कडधान्य. ४०) सात मुलांची आई. ४२) बांगडयांचा व्यवसाय करणारा. ४४) आजूबाजूस. ४७) वेळप्रसंगी, रात्री बेरात्री. ४९) रक्तवाहिनी. ५०) शिकार. ५१) स्वकीय नसलेला. ५२) पक्षांना फासा टाकून पकडणारा. ५४) वागणूक. ५५) अधिक महिना. ५६) फुलाची प्रथमावस्था. ५७) रत्नांची माळ. ५९) घोंगडी विणणारी जमात. ६१) दया. ६३) पाठविलेला. ६४) लोखंड घासण्याचे हत्यार.

## शब्दकोड२७८चे उत्तर

